## प्रपत्र सी — ७

**वृत्तपत्रे, समाजमाध्यमे व पक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यासाठी राजकीय पक्षांकरीता ज्याची उमेदवार म्हणून निवड झालेली आहे, तसेच इतर गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या व्यक्तींची निवड का केली नाही, अशा निवडीच्या कारणांसहित, अशा उमेदवाराबाबतची प्रलंबित फौजदारी खटल्यांसह माहिती**

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक — २०२४**
राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र**

१) मतदारसंघाचे नाव : **५ — बुलडाणा लोकसभा**
२) उमेदवाराचे नाव : **जाधव प्रतापराव गणपतराव**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | पूर्ववर्ती गुन्हेगारी | |
| | अ. गुन्ह्याचे स्वरूप | १) व २)<br>परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ व १४१ (Negotiable Instruments Act, 1881)<br>अभिसाक्षी संचालक असलेल्या शारंगधर शुगर मिल्स् लि. उकळी, ता. मेहकर, जि. बुलडाणा या कंपनीने कर्ज परतफेडीसाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्यामुळे कथित गुन्हा घडल्याचे म्हटलेले आहे. |
| | ब. प्रकरण क्रमांक | १) क्रिमिनल केस नं. २८७ / २०१४<br>२) क्रिमिनल केस नं. ४२३ / २०१५ |
| | क. न्यायालयाचे नाव | १) प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. १), मेहकर<br>२) प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. १), मेहकर |
| | ड. दोषरोप निश्चित केले आहेत किंवा नाही (होय / नाही ) | होय |
| | इ. दोषसिद्धीचा दिनांक, असल्यास | निरंक |
| | फ. झालेल्या शिक्षेचा तपशील, असल्यास | निरंक |
| | ग. द्यावयाची आवश्यक इतर कोणतीही माहिती | निरंक |
| | उमेदवाराच्या निवडीकरिता कारणे निवड हि उमेदवाराची अर्हता, संपादणूक व गुणवत्तेच्या संदर्भात असेल व केवळ मतदानात "निवडून येण्याची क्षमता" अशी नसेल (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |
| | गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या इतर व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड का होऊ शकत नाही याची कारणे (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय

आपला,

संजय भाऊराव मोरे
शिवसेना सचिव

मागील पानावरून

**अनु.क्र. २**

शिवसेना पक्षाने निवडलेला उमेदवार सुशिक्षित असून विद्यमान खासदार व शिवसेना नेते पदावर आहे. सर्व ६ विधानसभा क्षेत्रामध्ये या उमेदवाराचे चांगले सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य आहे. सदर उमेदवाराची जनमाणसात उत्तम प्रतिमा आहे. उमेदवार मतदारांच्या आणि सर्वसामान्य जनतेची कामे प्रामाणिकपणे करू शकेल असा शिवसेना पक्षाला विश्वास आहे. शिवसेना पक्षाच्या ध्येय धोरणांची व उद्दिष्टांची उमेदवाराला पूर्ण पणे कल्पना आहे. उमेदवार सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने त्याला या क्षेत्रातील पिण्याचे पाणी, रस्ते, शैक्षणिक सेवा, शेतकरी बांधवांच्या समस्या यांची नीट कल्पना आहे. उमेदवाराकडे संवाद साधून आपला मुद्दा पटवून सांगण्याची क्षमता आहे. मराठी, हिंदी या भाषांमधूनं उमेदवार आपले विचार उत्तम रित्या मांडू शकतो.

वरील गुणांचा विचार करून शिवसेना पक्षातर्फे **जाधव प्रतापराव गणपतराव** यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इतर इच्छुक उमेदवारांनी या निवडणुकीकरीता या उमेदवाराला मनःपूर्वक पाठींबा दिला आहे.

**अनु.क्र. ३**

अन्य व्यक्ती ज्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल नाहीत अशा उमेदवारांबाबत माहिती घेतली असता अशी व्यक्ती / सदस्य शिवसेना पक्षाकडे उमेदवारी मागण्यासाठी आलेली नव्हती. त्याच प्रमाणे वीस लाखांपेक्षा अधिक मतदारांमधून निवडून येण्यासाठी लागणारी वैयक्तिक संबंध आणि लोकप्रियता नसल्यामुळे अन्य व्यक्तींची निवड करण्यात आली नाही.

**आपला,**

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय

**संजय भाऊराव मोरे**
**शिवसेना सचिव**